CHE/DP/18953/Gen दि. 06/11/2019
CHE/DP/92/2019-2020
दि. 07/11/2019

# महाराष्ट्र शासन

क्रमांक : टिपीबी-४३१९/४२०/२०१९/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : ०६/११/२०१९.

प्रति,
**आयुक्त**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Indexation for DRCs issued under DCR 1991 of Slum Redevelopment & Heritage.

संदर्भ :- १) प्रॅक्टीसिंग इंजिनिअर्स आर्कीटेक्ट अॅन्ड टाऊन प्लॅनर्स असोसिएशन (इंडीया) (PEATA )चे पत्र दि. १५/०५/२०१९.
२) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र. Ch.Eng/D.P./१४८७२/TDR/Gen., dt. १८/०९/२०१९.

महोदय,

संदर्भित पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ दि. ८/०५/२०१८ हा प्रसिध्दीचा दिनांक धरुन सन १९९१ चे विनियमातील झोपडपट्टी पुनर्वसन व हेरिटेज अंतर्गत देण्यात आलेले विकास हक्क प्रमाणपत्र (DRC) हे जुन्या सन १९९१ च्या नियमावलीनुसार Indexation लागू न करता वापरण्याचा १ वर्षाचा कालावधी दि. ७/०५/२०१९ पर्यंत असल्याची महापालिकेची भूमिका उचित नाही असा अर्जदार PEATA यांचे म्हणणे असून विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील ई.पी. संदर्भात देण्यात आलेली मंजूरी शेवटची सुधारणा विचारात घेता अंतिमत: मंजूरी व प्रसिध्दी दिनांक १३/११/२०१८ विचारात घेवून तेव्हापासून १ वर्षा नुसार सन १९९१ चे नियमावलीनुसार टिडीआर Indexation न करता अनुज्ञेय करण्याचा १ वर्षाचा कालावधी दि. १२/११/२०१९ पर्यंत असल्याबाबत व तसे महापालिकेस कळविण्याबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे.

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३२(८)ची तरतूद ही ई.पी. ७० मध्ये होती. त्यास शासनाने दि.२१/०९/२०१८ रोजी मंजूरी दिली असून त्यास दि.१२/११/२०१८ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित केले आहे. सदर तरतूद दि. १३/११/२०१८ पासून अंमलात आलेली असल्याने अर्जदार यांची विनंती उचित असून बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ चे विनियमातील तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन व हेरिटेज अंतर्गत देण्यात आलेले विकास हक्क प्रमाणपत्र (DRC) हे

सन १९९१ च्या नियमावलीनुसार Indexation लागू न करता वापरण्याचा एक वर्षाचा कालावधी दि.१२/११/२०१९ पर्यंत राहील, असे आपणांस कळविण्याच्या मला सूचना आहेत.

आपला,

( निर्मलकुमार पं. चौधरी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव** :-

१) प्रमुख अभियंता ( विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका.

२) मे. प्रॅक्टीसिंग इंजिनिअर्स आर्कीटेक्ट ॲन्ड टाऊन प्लॅनर्स असोसिएशन (इंडीया) (PEATA ), मुंबई.

३) निवडनस्ती (नवि-११)